# मंत्रिमंडळ निर्णय

**दिनांक १० जुलै, २०२५**
**(बैठक क्र. २८)**
**(पावसाळी अधिवेशन)**

| अ.क्र. | विषय | विभाग |
|---|---|---|
| १ | शासनाच्या अनुकंपा नियुक्तीच्या सर्वसमावेशक सुधारित धोरणास मान्यता | **सामान्य प्रशासन विभाग** |
| २ | सांगलीतील 'एल' धारणाधिकार ६४ जमिनींचे 'ए' सत्ता प्रकारात रूपांतरणास मान्यता | **महसूल विभाग** |
| ३ | कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्याच्या भाडेकरार कालावधी वाढीस मान्यता | **सहकार विभाग** |
| ४ | पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या विविध प्रकल्पांना मान्यता | **सहकार विभाग** |
| ५ | पशु संवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा | **पशु संवर्धन विभाग** |
| ६ | मुंबईतील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गासाठी २ हजार कोटी रूपयांच्या कर्जास शासनहमी | **नगर विकास -१ विभाग** |
| ७ | मुंबई मेट्रो मार्ग-५, ६, ७अ, ९, १० व १२ या प्रकल्पांच्या कर्जाच्या दायित्वास, करारनाम्यास मान्यता | **नगर विकास विभाग** |

**<u>सामान्य प्रशासन विभाग</u>**

## शासनाच्या अनुकंपा नियुक्तीच्या सर्वसमावेशक सुधारित धोरणास मान्यता

राज्य शासनाच्या अनुकंपा तत्त्वावरील नियुक्तीच्या सर्वसमावेशक सुधारित धोरणास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

राज्य शासनाकडून अनुकंपा तत्त्वावर नियुक्तीसाठी १९७६ पासून योजना लागू करण्यात आली आहे. सन १९९४ मध्ये पूर्वीची योजना रद्द करून सुधारित योजना लागू करण्यात आली. आतापर्यंत या धोरणानुसार अनुकंपा नियुक्ती देण्याची कार्यवाही करण्यात येत होती. मात्र या धोरणात काही सुधारणा करण्याची आवश्यकता होती. १९८४ पासून याबाबत वेळोवेळी एकूण ४५ आदेश निर्गमित करण्यात आले होते. हे सर्व आदेश अधिक्रमित करून नवीन धोरणास मंजुरी देण्यात आली. या सुधारणांसह नवीन अनुकंपा नियुक्ती धोरणास मान्यता देण्यात आली. या धोरणात न्यायालयीन अडचणी, अनुकंपा नियुक्तीच्या कार्यवाहीतील विलंब आणि योजनेचे सुलभीकरण करण्यावर भर देण्यात आला आहे. याबाबतचा सविस्तर शासन निर्णय काढण्यात येणार आहे.

*****

**<u>महसूल विभाग</u>**

## सांगलीतील ‘एल’ धारणाधिकार ६४ जमिनींचे ‘ए’ सत्ता प्रकारात रूपांतरणास मान्यता

सांगली शहरातील ‘एल’ धारणाधिकार सत्ता प्रकाराच्या जमिनीचे रूपांतरण ‘ए’ सत्ता प्रकारात करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका हद्दीतील सांगली शहर येथील सांगली संस्थानाच्या सि.स.नं.१ व त्यातील आंतरविभाजन/पोटहिश्श्यामुळे सन १९२८ मध्ये तयार झालेल्या एकूण ६४ मिळकती श्रीमंत पटवर्धन राजासाहेब सांगली यांच्याकडून कायम खरेदी दस्ताने व मालकी हक्काने संबंधितांच्या नावाने झाल्या होत्या. तरीही या मिळकती शासकीय अभिलेखावर “एल” सत्ता प्रकार (शासकीय जागा/इमारती) म्हणून नोंदविल्या गेल्या होत्या. त्यामुळे या मिळकतींच्या खरेदी-विक्री व्यवहार, वापरात बदल इ. बाबत निर्बंध येत होते. या मिळकती शासकीय नसून त्या भाडेपट्ट्यानेही देण्यात आलेल्या नाहीत. तसेच शासकीय जमिनींवरील अतिक्रमणदेखील नाहीत. या मिळकती रितसर खरेदीखताद्वारे संबंधितांना विकत घेतलेल्या असल्यामुळे त्यांना निर्बंधमुक्त करणे आवश्यक होते. यासाठी एकूण ६४ मिळकतींचे “एल” सत्ता प्रकारातून विनामूल्य “ए” (खाजगी/नियंत्रणमुक्त) सत्ता प्रकारात रूपांतरण करण्यास आज झालेल्या बैठकीत मान्यता देण्यात आली.

*****

**<u>सहकार विभाग</u>**

## कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखान्याच्या भाडेकरार कालावधी वाढीस मान्यता

नाशिक जिल्ह्यातील कर्मवीर काकासाहेब वाघ सहकारी साखर कारखानाच्या भाडेकरार कालावधीस ५ वर्षांची वाढ करण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

कर्मवीर कामासाहेब वाघ सहकारी साखर कारखाना लि., काकासाहेबनगर (ता.निफाड) हा अवसायनात काढण्यात आला आहे. हा कारखाना भाडेतत्त्वावर चालविण्यास देण्याकरिता भाडेकरार केल्यापासून ३ वर्षात गाळप क्षमता १२५० मे.टनावरुन प्रतिदिनी २५०० मे.टन वाढ करण्याच्या अटीवर भाडेकराराचा कालावधी १५ वर्षांच्या ऐवजी २० वर्षांचा करण्यास मान्यता देण्यात आली. अशी गाळप क्षमता न वाढविल्यास भाडेकराराचा कालावधी १५ वर्षांचाच राहणार आहे.

*****

<u>**सहकार विभाग**</u>

## पद्मश्री डॉ.विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याच्या विविध प्रकल्पांना मान्यता

अहिल्यानगर जिल्ह्यातील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर, (ता.राहाता) या कारखान्यास डिस्टीलरी, बायोगॅस, बायो सीएनजी, हायड्रोजन पोटॅश पावडर, सौर उर्जा निर्मिती, को-जन असे प्रकल्प बूट (Build-Own-Operate-Transfer) तत्त्वावर उभारणीस आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

ही मान्यता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम २०-अ मध्ये नमूद तरतुदींच्या अधीन राहून देण्यात आली असून याकरिता पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील, सहकारी साखर कारखाना लि. प्रवरानगर व झेडआरटू बायोएनर्जी, अहमदाबाद यांच्यादरम्यान करार होणार आहे.

हा करार साखर आयुक्त, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. त्यासाठी बूट तत्त्वावरील प्रकल्पाच्या साखर कारखाना आणि खाजगी भागीदार यांच्या जबाबदाऱ्या निश्चित करून घेण्यात याव्यात. बूट तत्त्वावरील प्रकल्पाच्या साखर कारखाना आणि खाजगी भागीदार प्रकल्प यांच्यातील करार कालावधी हा १५ वर्षांचा असेल. त्यामुळे सर्व प्रकल्प १५ वर्षांनंतर कारखान्याला परत मिळतील. प्रकल्प उभारणीचा कालावधी, कार्यान्वन, संचालन व देखभाल याबाबतच्या स्पष्ट तरतुदी करारामध्ये नमूद कराव्यात. प्रकल्प हस्तांतरण आणि करार रद्द करणे याबाबत स्पष्ट तरतुदी करारामध्ये नमूद कराव्यात. सहकारी साखर कारखान्यांना बूट तत्त्वावरील प्रकल्प कारखान्यास आर्थिक सक्षमता प्राप्त झाल्यानंतर खरेदी करता येण्याची तरतूद करारामध्ये करावी. कारखान्यास देय रकमांच्या बाबतीत निश्चित वेळापत्रक तयार करून त्यानुसार विकासकाने देय रकमा कारखान्याकडे वेळेत द्याव्यात, अशी तरतूद करारात करण्यात यावी. प्रकल्पांच्या अनुषंगाने प्राप्त झालेली किंवा प्राप्त होणार असलेली शासनाची मदत, अनुदान व सवलती या साखर कारखान्यालाच मिळतील अशी स्पष्ट तरतूद करारात करण्यात यावी. बूट कालावधीत विकासकाच्या कोणत्याही कर्जाची अथवा तत्सम आर्थिक व कायदेशीर बाबींची जबाबदारी कारखान्यावर राहणार नाही. प्रकल्पातील कर्मचाऱ्यांना भविष्य निर्वाह निधी, कामगार कल्याण निधी व विमा वगैरे रक्कम विकासकाने कामगार कायद्याप्रमाणे द्यावयाची आहे. करार कालावधीत प्रकल्पात कोणत्याही कर्मचाऱ्याचा अपघात, निधन झाल्यास त्याचा वैद्यकीय खर्च, नुकसानभरपाई इ. कामगार कायद्याप्रमाणे विकासकास द्यावी लागेल, आदी अटी व शर्ती घालण्यात आल्या आहेत.

*****

<u>**पशु संवर्धन विभाग**</u>

## पशु संवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा

राज्यातील पशुपालकांच्या उत्पन्नात वाढ होण्याबरोबरच राज्याच्या सकल उत्पन्नात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढावा यासाठी पशुसंवर्धन व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

महाराष्ट्र आर्थिक सल्लागार परिषदेने सन २०२८ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचविण्यासाठी पथदर्शी आराखडा सादर केला आहे. या आराखड्यात हे उद्दिष्ट्य साध्य करण्यासाठी उत्पन्नवाढीचे आठ घटक निश्चित केले आहेत. त्यामध्ये कृषि व संलग्न घटकाचा समावेश असून राज्याच्या सकल उत्पन्नात कृषि क्षेत्राचा वाटा १२ टक्के आहे. कृषि क्षेत्राच्या या उत्पन्नात पशुजन्य उत्पन्नाचा वाटा २४ टक्के इतका आहे.

निती आयोगाने सकल उत्पादनात पशुसंवर्धन व्यवसायाचा सहभाग वाढविण्याची शिफारस केली आहे. पशुपालकांना भेडसावणाऱ्या कृषि वीज दराच्या तुलनेत जास्त वीज दर, सोलर एनर्जीसाठी अनुदानाचा अभाव, ग्रामपंचायत कर, शेती कर्जाच्या व्याज दराच्या तुलनेत अधिक व्याज दराची कारणी या अडचणींचे निराकरण झाल्यास पशुपालन व्यवसायाकडे लोकांचा कल वाढून पशुजन्य उत्पादनात वाढ होणार आहे. व्यावसायिक नफ्यात वाढ तसेच स्पर्धात्मक वातावरण यामुळे तुजन्य उत्पादित बाबीस मुल्यवर्धन साखळीची निर्मिती, शेती प्रमाणे गट पद्धतीने पशुसंवर्धन, याधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब यासारख्या बाबीमध्ये आपोआप वाढ (resultant increase) होणार आहे. यासाठी पशुपालक व्यवसायास प्रोत्साहन देण्यासाठी कृषि व्यवसायाप्रमाणे सवलती देणे आवश्यक असल्याने या व्यवसायास कृषि समकक्ष दर्जा देण्याचा निर्णय घेण्यात आला.

या निर्णयानुसार आता २५,००० मांसल कुक्कुट पक्षी/५०,००० अंडी उत्पादक कुक्कुट पक्षी क्षमतेच्या तसेच ४५,००० क्षमतेच्या हॅचरी युनिटच्या कुक्कुटपालन व्यवसाय, १०० दुधाळ जनावरे संगोपन, ५०० मेंढी/शेळी पालन व २०० वराह या पशुसंवर्धनविषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी "कृषि इतर" वर्गवारीऐवजी कृषि वर्गवारीप्रमाणे करण्यात येईल.

तसेच पशुपालन व्यवसायास स्वतंत्र व्यवसाय न समजता शेती व्यवसाय समजून ग्रामपंचायत कर दरात एकसमानता आणण्याकरिता कृषि व्यवसायास ज्या दराने कर आकारणी केली जाते त्याच दराने कर आकारणी करण्यात येईल. कुक्कुटपालन व इतर पशुसंवर्धन व्यवसायासाठी सोलर पंप व इतर सोलार संच उभारण्यास सवलत देण्यात येईल. कृषिप्रमाणे या पशुपालन व्यवसायास कर्जावरील व्याज दरात सवलत देण्यात येणार आहे.

*****

**<u>नगर विकास विभाग</u>**

## मुंबईतील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह भुयारी मार्गासाठी २ हजार कोटी रूपयांच्या कर्जास शासनहमी

मुंबई शहरातील पूर्व मुक्त मार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यानच्या भुयारी मार्ग प्रकल्पासाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाच्या २ हजार कोटींच्या रक्कमेस शासनहमी देण्यास आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

मुंबई शहरातील पूर्व मुक्त मार्गाजवळील ऑरेंज गेट ते मरीन ड्राईव्ह दरम्यान ३+३ पदरी मार्गाचे दोन भुयारी मार्ग बांधण्यात येणार आहे. त्यांची लांबी ९.२३ कि.मी. असेल. हा प्रकल्प मुंबई महानगर विकास प्राधिकरणास २० टक्के अंशदान आणि ८० टक्के कर्ज या वित्तीय प्रमाणात राबविण्यास मान्यता देण्यात आली आहे. प्राधिकरणास यापूर्वी पॉवर फायनान्स कार्पोरेशन लि. कडून घ्यावयाच्या १२ हजार कोटी रूपयांच्या कर्जासाठी शासनहमी देण्यात आली होती. या हमीमध्ये बदल करून पीएफसीला ९ एप्रिल, २०२५ रोजी १० हजार कोटी रूपयांच्या रकमेची शासन हमी देण्यात आली. त्यामुळे उर्वरित २ हजार कोटी रुपयांचे कर्ज आता युनियन बँक ऑफ इंडिया यांच्याकडून घेण्यास तसेच या कर्जासाठी शासनहमी देण्यास या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्थांबाबत आवश्यक करारपत्र करण्यासही मान्यता देण्यात आली.

*****

## मुंबई मेट्रो मार्ग-५, ६, ७अ, ९, १० व १२ या प्रकल्पांच्या कर्जाच्या दायित्वास, करारनाम्यास मान्यता

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या मुंबई मेट्रो मार्ग-५, ६, ९ आणि ७अ, १० व १२ या प्रकल्पांकरिता घेण्यात येणाऱ्या कर्जाचे आकस्मिक दायित्व स्वीकारण्यास तसेच त्यानुषंगाने करावयाच्या प्रकल्प करारनाम्यांना आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस होते.

या सर्व प्रकल्पांकरिता शासनाने यापूर्वीच मान्यता दिली असून त्यासाठी आवश्यक निधीच्या कर्ज उभारणीस मान्यता दिली आहे. यात मेट्रो लाईन ५ करिता ( प्रकल्प किंमत ८ हजार ४१६ कोटी ५१ लाख) २ हजार ३५७ कोटी २५ लाख बाह्य सहाय्यित कर्ज एशियन इन्फ्रास्ट्रक्चर इन्हेस्टमेंट बँक व ओपेक फंड फॉर इंटरनॅशरल डेव्हलपमेंट या दोन वित्तीय संस्थांकडून संयुक्तपणे घेण्यात येणार आहे. मेट्रो लाईन ६ करिता ( प्रकल्प किंमत ६ हजार ७१६ कोटी) १ हजार ६९९ कोटी ६२ लाख बाह्य सहाय्यित कर्ज न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणार आहे. मेट्रो लाईन ९ आणि ७अ करिता ( प्रकल्प किंमत ६ हजार ६०७ कोटी) १ हजार ६३९ कोटी २५ लाख बाह्य सहाय्यित कर्ज न्यू डेव्हलपमेंट बँक यांच्याकडून घेण्यात येणार आहे. मेट्रो लाईन १० करिता ( प्रकल्प किंमत ४ हजार ४७६ कोटी) २ हजार ८१७ कोटी ८४ लाख बाह्य सहाय्यित कर्ज एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून घेण्यात येणार आहे. मेट्रो लाईन १२ करिता ( प्रकल्प किंमत ५ हजार ८६५ कोटी) ३ हजार ७७ कोटी बाह्य सहाय्यित कर्ज एशियन डेव्हलपमेंट बँकेकडून घेण्यात येणार आहे.

यानुसार प्राधिकरणाला द्विपक्षीय/बहुपक्षीय वित्तीय संस्था/अन्य वित्तीय संस्थामार्फत सुलभ व्याज कर्ज पध्दतीने हा निधी उभारता येणार आहे. या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची प्राथमिक जबाबदारी ही प्राधिकरणाची राहणार आहे. आजच्या बैठकीत या प्रकल्पांसाठी घेण्यात येणाऱ्या कर्जाची मुद्दल, व्याज व इतर शुल्क यांच्या परतफेडीची दायित्व/आकस्मिक जबाबदारी राज्य शासनाद्वारे स्वीकारण्यास मान्यता देण्यात आली. तसेच सदर कर्ज सहाय्यासाठी आवश्यकता भासल्यास राज्य शासनाकडून हमी देण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्पांसाठी घेण्यात बाह्य कर्ज सहाय्याच्या अनुषंगाने संबंधित वित्तीय संस्था आणि केंद्र शासन यांच्यात कर्ज करारनामा करण्यास तसेच संबंधित वित्तीय संस्था, राज्य शासन (नगर विकास विभाग) आणि मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यात प्रकल्प करारनामा करण्यास मान्यता देण्यात आली. प्रकल्पांसाठी घेण्यात बाह्य कर्ज सहाय्याच्या अटी व शर्ती, मुद्दल, व्याजाची परतफेड इ. मुद्यांबाबत अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/सचिव, वित्त विभाग, अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव (नवि-१) व महानगर आयुक्त, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्यामध्ये दुय्यम कर्ज करारनामा (subsidiary Loan Agreement) करण्यास मान्यता देण्यात आली. हे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याची जबाबदारी प्राधिकरणाची राहणार आहे. या प्रकल्पास काही कारणास्तव विलंब झाल्यास अथवा काही कारणांमुळे आवश्यक निधीमध्ये भविष्यात वाढ झाल्यास, या वाढीव रकमेचा भार प्राधिकरणाने उचलावा, अशी अट घालण्यात आली आहे.

*****